विपणन तथा प्रचार विभाग
Marketing Publicity Department
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
प्रधान कार्यालय : लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5
Head office: Lokmangal,1501, Shivajinagar, Pune-5
टेलीफोन/TELE : 020-25614285-324
cmmktg@mahabank.co.in; media@mahabank.co.in;

# दुर्बल घटकांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी महाबँक ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्था समर्पित भावनेने कार्य करत आहे- बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री ए. एस. राजीव

## महाबँक-आरसेटी नाशिकच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन श्री राजीव यांच्या हस्ते संपन्न

**पुणे, 23 सप्टेंबर 2019:** महाबँक ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्था (महाबँक आरसेटी) ही संस्था आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी समर्पित भावनेने कार्य करत असून ग्रामीण भागातील अधिकाधिक युवक-युवती आणि महिला या संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या दर्जेदार आणि उपयुक्त प्रशिक्षणाचा लाभ घेतील असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री ए. एस. राजीव यांनी केले. ग्रामीण भागातील युवक आणि महिलाना व्यवसायासाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्यासाठी महाबँक आर-सेटी या संस्थेची स्थापना करण्यात आलेली आहे. या संस्थेच्या नाशिक येथील नूतन इमारतीचा उद्घाटन समारंभ नुकताच आयोजिला होता त्यावेळी श्री राजीव बोलत होते. कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या सीईओ एस. भूवनेश्वरी, अपर जिल्हाधिकारी श्री नीलेश सागर, मुख्य कार्यालय पुणे येथील सरव्यवस्थापक एन. एस. देशपांडे, नाशिक क्षेत्रीय व्यवस्थापक बी. एस. टाव्हरे आणि राज्याचे आर सेटी संचालक श्री सुनील कस्तुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बचत गटांना, कृषी कर्जदार तसेच एमआरसेटी प्रशिक्षित व्यावसायिकांना कर्ज मंजूरी पत्रे देण्यात आली.

सीईओ भुवनेश्वरी यांनी महाबँक आरसेटीच्या कार्याचा गौरव करत प्रशासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असा विश्वास दिला. अपर जिल्हाधिकारी श्री नीलेश सागर यांनी नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील गरजा लक्षात घेऊन नवनवीन कार्यक्रम राबवण्याचे आवाहन केले. नाशिकच्या केंद्राबाबत श्री सागर यांनी कौतुक केले. श्री कस्तुरे यांनी राज्यभरातील एमआरसेटी केंद्रांच्या कार्याचा आढावा घेऊन समाधान व्यक्त केले.

श्री राजीव यांनी यावेळी अमरावती जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी महाशेतकरी आत्मनिर्भय योजनेचा शुभारंभ केला. या योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील बेरोजगार युवकांना आत्मनिर्भय करण्यासाठी व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात येईल. कार्यक्रमास जिल्ह्यातील बचत गत सदस्य, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**फोटोमध्ये**: नाशिक येथील महाबँक एमआर सेटीच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन करताना बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री ए. एस. राजीव, सोबत जिल्हा परिषद सीईओ एस. भूवनेश्वरी, अपर जिल्हाधिकारी श्री नीलेश सागर, सरव्यवस्थापक एन. एस. देशपांडे, श्री सुनील कस्तुरे, आणि क्षेत्रीय व्यवस्थापक बी. एस. टाव्हरे